आकाशवाणी मुंबई
राष्ट्रीय बातमीपत्र - रात्री ८.०५ वाजता
१४ सप्टेंबर २०२६ - सोमवार

**ठळक बातम्या**

- राज्यात सर्वत्र गणरायाचं उत्साहात आगमन / गणेशोत्सव पारंपरिक आणि पर्यावरणस्नेही पद्धतीनं साजरा करण्याचं मुख्यमंत्र्यांचं आवाहन

- बहुभाषिक संस्कृती असलेल्या महाराष्ट्रानं सर्व भाषकांना मोठ्या मनानं सामावून घेतलं असल्याचं केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांचं प्रतिपादन

- घाऊक किमतीवर आधारित चलन फुगवट्याच्या दर ९ पूर्णांक ९२ शतांश, तर किरकोळ चलन फुगवट्याचा दर ४ पूर्णांक ८२ शतांश टक्क्यावर

- नेपाळला या वर्षअखेरपर्यंत दररोज १८ तास पुरेल इतकी वीज निर्यात करायला सरकारची मंजुरी

**आणि**

- दिशा सालियान मृत्यू प्रकरणी सीबीआयकडून एफआयआर दाखल

**<><><><><>**

आज भाद्रपद शुद्ध चतुर्थी म्हणजेच गणेशचतुर्थी. १० दिवस चालणाऱ्या गणेशोत्सवाचा प्रारंभ आज झाला. मुंबईत सुमारे सव्वा लाख घरगुती आणि दहा हजार सार्वजनिक गणेशमूर्तींची भक्तिभावानं प्रतिष्ठापना झाली. केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस, आणि उपमुख्यमंत्री एकमाथ शिंदे यांच्या निवासस्थानी, तसंच वांद्रे इथं सांस्कृतिक कार्यमंत्री आशिष शेलार यांच्या मंडळाच्या सार्वजनिक गणेशमूर्तीचं दर्शन घेतलं.

यंदाच्या गणेशोत्सवात पर्यावरणस्नेही साहित्यापासून बनवलेल्या मूर्ती आणि सजावटीला पसंती मिळत आहे. यंदा ध्वनी प्रदूषण रोखण्याच्या दृष्टीनं पारंपरिक वाद्यांच्या वापरावर भर दिल्याचं दिसतं. पुण्यात मानाच्या ५ गणपतींसह विविध गणेश मंडळांच्या मूर्तींची प्रतिष्ठापना झाली. पुण्यातही पारंपरिक वाद्यांवर भर दिल्याचं दिसतं. नागपुरात 'श्रीगणेशा आरोग्याचा' अभियानांतर्गत १४ ते २५ सप्टेंबरदरम्यान आरोग्य आणि रक्तदान शिबिरं घेतली जाणार आहेत. ध्वनिप्रदूषणाविरोधात मूक मोर्चाही काढण्यात आला. केंद्रीय मंत्री नितीन

गडकरी यांनी निवासस्थानी गणेशाची प्राणप्रतिष्ठा करून देशाच्या सुख-समृद्धीसह भारताला विश्वगुरू बनवण्याची प्रार्थना केली.

**गणेश चतुर्थीनिमित्त राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू, उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन, आणि प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनी गणेशोत्सवानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.**

**<><><><><>**

गणेशोत्सवाला राज्य महोत्सवाचा दर्जा मिळाल्यानिमित्त महाराष्ट्राच्या लोककला आणि सांस्कृतिक परंपरेचा देश-विदेशात जागर होणार आहे. सांस्कृतिक कार्य संचालनालय ३६ जिल्ह्यांसह विविध राज्यं, नवी दिल्ली आणि दुबईत 'लोककलेतील श्रीगणेश' हा उपक्रम राबवणार आहे. देहरादून, जम्मू, चेन्नई, सिल्वासा, लखनऊ, कोटा, अमरावती, कोलकाता आणि हैदराबाद येथे नमन, लेझीम, धनगरी, कोळी, आदिवासी नृत्य, मंगळागौर, गोंधळ आदी लोककलांचं सादरीकरण होईल. नवी दिल्लीत नाटक, चित्रपटगीतं आणि लावणी, तर २६ सप्टेंबरला दुबईत महाराष्ट्राच्या लोकपरंपरांचा जागर होणार आहे. मुंबईत १७ ते २४ सप्टेंबरदरम्यान शास्त्रीय संगीत महोत्सवही आयोजित केला आहे.

**<><><><><>**

गणेशोत्सवातली कला, परंपरा आणि सांस्कृतिक वारशाला जागतिक स्तरावर डिजिटल व्यासपीठ मिळवून देण्यासाठी जागतिक महागणेशोत्सव रील स्पर्धेचं आयोजन करण्यात आलं आहे. आजपासून २४ सप्टेंबरपर्यंत ही स्पर्धा होईल. जागतिक सर्वोत्तम रील ठरणाऱ्या स्पर्धकाला १ लाख रुपये, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र, तर महाराष्ट्रातल्या आणि महाराष्ट्राबाहेरच्या सर्वोत्तम रीलसाठी प्रत्येकी ५० हजार रुपये, सन्मानचिन्ह आणि प्रमाणपत्र देऊन गौरवण्यात येणार आहे.

**<><><><><>**

गणेशोत्सव पारंपरिक आणि पर्यावरणस्नेही पद्धतीनं साजरा करण्याचं आवाहन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केलं आहे. ते आज मुंबईत वर्षा निवासस्थानी श्रीगणेशमूर्तीची प्रतिष्ठापना केल्यानंतर बातमीदारांशी बोलत होते. २०२९ पर्यंत समान नागरी कायदा लागू करण्यासंदर्भात ते म्हणाले की, राज्यशासनानं याकरता नेमलेल्या ७ सदस्यीय समितीचा अहवाल प्राप्त झाल्यानंतर विधेयक विधीमंडळात सादर केलं जाईल.....

**होल्ड - बाईट -मुख्यमंत्री UCC.**

मराठा आरक्षणासंदर्भात आंदोलनकर्त्यांच्या बहुतेक सर्व मागण्या मान्य झाल्या आहेत, अशा परिस्थितीत मनोज जरांगे यांनी मुंबईत गणेशोत्सव काळात आंदोलन करणं उचित नाही, अशी प्रतिक्रीया मुख्यमंत्र्यांनी दिली.

**होल्ड- बाईट- मुख्यमंत्री (मराठा आरक्षण)**

**<><><><><>**

मराठा आरक्षण आंदोलनाचे नेते मनोज जरांगे १५ सप्टेंबरला एकटेच मुंबईला येणार असून त्यांनी इतर मराठा बांधवांना मुंबईकडे न येण्याचं आवाहन केलं आहे. सणावारांच्या कालावधीत दंगल घडवून मराठा समाजाला गालबोट लावण्याच्या प्रयत्न केला जाणार असल्याचं मत जरांगे  यांनी सूत्रांकडे व्यक्त केलं आहे.

**<><><><><>**

महाराष्ट्राची संस्कृती ही बहुभाषिक असून महाराष्ट्रानं सर्व भाषकांना मोठ्या मनानं आपल्यात सामावून घेतलं आहे, असं प्रतिपादन केंद्रीय गृहमंत्री अमित शहा यांनी आज केलं. नवी मुंबईत वाशी इथं हिंदी दिवस २०२६ आणि सहावं अखिल भारतीय राजभाषा संमेलनाचं उद्घाटन केल्यानंतर ते बोलत होते. महाराष्ट्राइतका बहुभाषिक प्रदेश इतरत्र कुठंही नाही, असं शहा म्हणाले.

***होल्ड... बाईट- अमित शहा***

राजकीय मतभेद सोडून भारतीय भाषांना चालना देण्यावर भर द्यायचं आवाहन शहा केलं.

आपण आपल्या भाषांचा सन्मान केला नाही, तर जगही करणार नाही, त्यामुळे राजभाषा, निजभाषा, मातृभाषेसह देशातल्या सर्व भाषांचा सन्मान करणं गरजेचं आहे, असं प्रतिपादन मुख्यमंत्री देवेंद्र फडनवीस यांनी केलं.

केंद्रीय गृहराज्यमंत्री नित्यानंद राय, उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार आणि एकनाथ शिंदे यांच्यासह इतर या कार्यक्रमाला उपस्थित होते. यावेळी शहा यांनी राजभाषा गौरव आणि राजभाषा कीर्ती पुरस्कारांचं वितरण केलं. तसंच विविध पुस्तकं आणि ॲप्सचं लोकार्पणही शहा यांच्या हस्ते यावेळी झालं.

**<><><><><>**

अन्नपदार्थ, इंधन, ऊर्जा तसंच औद्योगिक उत्पादनांच्या किमतीत वाढ झाल्यानं ऑगस्ट महिन्यात घाऊक किमतीवर आधारित चलन फुगवट्याच्या दर ९ पूर्णांक ९२ शतांश टक्क्यावर पोहचला. केंद्र सरकारनं आज ही आकडेवारी जाहीर केली. जुलै महिन्यात ६ पूर्णांक ६५ शतांश टक्के असलेला खाद्यान्न निर्देशांक ऑगस्ट महिन्यात ७ पूर्णांक ५ शतांश टक्के झाला, इंधन आणि ऊर्जा क्षेत्रांचा घाऊक किंमतीवर आधारित चलन फुगवट्याचा दर २२ पूर्णांक ९३ शतांश टक्के राहिला.

ऑगस्ट महिन्यात किरकोळ चलन फुगवट्याचा दर ४ पूर्णांक ८२ शतांश टक्के म्हणजेच सलग तिसऱ्या महिन्यात रिझर्व्ह बँकेच्या ४ टक्के लक्ष्याच्या वर राहिला. ग्रामीण भागात तो ५ पूर्णांक २३ शतांश टक्के, तर शहरी भागात ४ पूर्णांक ३१ शतांश टक्के राहिला.

**<><><><><>**

नेपाळला या वर्षअखेरपर्यंत दररोज १८ तास पुरेल इतकी वीज निर्यात करायला सरकारनं मंजुरी दिली आहे. मुझफ्फरपूर-ढालकेबार लाइनमधून ६०० मेगावॅटपर्यंत, तर तनकपूर-महेंद्रनगर लाइनमधून ५४ मेगावॅटपर्यंत वीज निर्यात केली जाईल. नेपाळमध्ये ऑगस्ट महिन्यात आलेल्या महापुरामुळे जलऊर्जा सुविधांना मोठा फटका बसल्याने त्यांची वीजनिर्मिती क्षमता कमी झाली आहे. या कठीण परिस्थितीत भारताने वीज दिल्यामुळे नेपाळ आणि भारत यांच्यातलं दीर्घकालीन ऊर्जा सहकार्य आणखी बळकट होईल, असा विश्वास ऊर्जा मंत्रालयानं व्यक्त केला आहे.

**<><><><><>**

दिशा सालियान मृत्यू प्रकरणी सीबीआयनं एफआयआर दाखल करून घेतला आहे. दिशा ही दिवंगत अभिनेता सुशांत सिंह राजपूत याची मॅनेजर होती आणि ८ जून २०२० रोजी इमारतीच्या १२व्या मजल्यावरून पडून तिचा मृत्यू झाला होता. या प्रकरणी एफआयआर दाखल करायचे आदेश मुंबई उच्च न्यायालयानं दिले होते. त्यानुसार, हा एफआयआर काल दाखल झाला आहे. तत्कालीन मुख्यमंत्री उद्धव ठाकरे, आदित्य ठाकरे, त्यांचे सुरक्षारक्षक, दिनो मोरिया, रोहन रॉय, सूरज पंचोली, रिया चक्रवर्ती, शोविक चक्रवर्ती, पोलीस अधिकारी सचिन वाझे, परमबीर सिंह यांच्यासह इतर अनेक जणांचा उल्लेख एफआयआरमध्ये करण्यात आला आहे.

**<><><><><>**

प्राध्यापक भरतीसाठी आवश्यक असलेली सेट म्हणजे महाराष्ट्र राज्यस्तरीय पात्रता परीक्षा आता २५ ऑक्टोबर रोजी होणार आहे. सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठाच्या सेट विभागानं प्रसिद्धीपत्रकाद्वारे ही माहिती दिली आहे. यापूर्वी ही परीक्षा २७ सप्टेंबर रोजी होणार होती.

<><><><><>

माजी राज्यमंत्री मदन बाफना यांचं आज अल्पशा आजारानं पुण्यात निधन झालं. ते ८७ वर्षांचे होते. १९८५ मध्ये ते पहिल्यांदा मावळ मधून आमदार म्हणून निवडून आले होते.

//<><><><><>//